# गायी म्हशीतील बाह्यपरोपजीवी नियंत्रण

जंनावरांच्या शरीरावरील बाह्यपरोपजीवीमध्ये प्रामुख्याने उवा, पिसवा, गोचीड, गोमाशा व चावणाऱ्या माशा यांचा समावेश असतो.

## बाह्यपरोपजीवीमुळे जनावरांत होणारे दुष्परिणाम :



१. परोपजीवीनीं जनावरांचे सतत रक्त शोषण केल्यामुळे जनावरांस रक्तक्षय होतो.

२. बाह्यपरोपजीव असलेल्या जागी जनावरे खाजवतात, त्या भागावरील केस गळतात.

३. जनावरें बैचेन व त्रस्त होतात त्यामुळे त्यांच्या खाण्यापिण्यावर परिणाम होवून दूध उत्पादन घटते.

४. जनावरांचे वजन कमी होते व रोगप्रतिकार शक्ति कमी होते.

५. लहान वासरांची वाढ खुंटते.



६. बाह्यपरोपजीव जनावरांच्या शरीराचा चावा घेतात त्यामुळे कातडीवर पुरळ येतात व गाठी तयार होतात.

७. माशा शरीराच्या जखमावर अंडी घालतात त्यामुळे जखमांत आळी पडते व जनावरांस प्रचंड त्रास होतो.

८. गोचीडाद्वारे थायलेरिओसिस, बबेसिओसिस, अनाप्लाझमोसिस तर चावणाऱ्या माश्यामुळे सर्‍रा यासारखे महाभयंकर रोग एका जनावरांपासून दुसऱ्याकडे पसरतात. त्यामुळे जनावरे दगावण्याची शक्यता असते.

## प्रतीबंधात्मक उपाय :



१. गायी म्हशीच्या अंगावर व गोठ्यात कीटकनाशक (उदा. डेल्टामेथ्रीन, सायपरमेथ्रीन) औषधांची फवारणी दर पंधरा दिवसांनी करावी.

२. फवारणी करतांना शरीरावर जखमा नाहीत याची तपासणी करावी. जखम असल्यास जखमेच्या जागी फवारणी करू नये. त्याचप्रमाणे नाक, तोंड व डोळ्याचा भाग सोडून फवारणी करावी.



३. फवारणी जनावरांच्या अंगावर विशेषता दोन्ही पायांच्या मधला भाग, शेपटीखालील भाग, पोटाचा भाग, कानाखालील भाग यावर करावी.

४. गोठ्यातील कोपऱ्यात व खाचामध्ये फवारणी करावी.

५. गोठा सदैव स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवावा.

## बाह्यपरोपजीवींच्या नियंत्रणासाठी वापरावयाची औषधे, त्यांची मात्रा, मार्ग

| किटकनाशकाचे नाव | मात्रा |
|---|---|
| **रासायनिक औषधे :** | |
| १. डेल्टामेथ्रीन (ब्युटॉक्स ) | २-४ मिली प्रती लिटर पाण्यात(फवारणी) |
| २. सायपरमेथ्रीन (पेक्टोसाइड,क्लीनर ) | १-२ मिली प्रती लिटर पाण्यात (फवारणी) |
| ३. अमित्राज ( टाकटीक,एक्सोडेक्स) | ६ मिली प्रती लिटर पाण्यात (फवारणी) |
| **रासायनिकऔषधे :** | |
| १. क्लोझेंटल द्रावण व गोळ्या | १०-१५ मी. ग्रॅम/ किलो वजना प्रमाणे तोंडातून |
| २. इंजे.आयवरमेक्टिन | १मिलि / ५० किलो वजन याप्रमाणे त्वचेखाली द्यावे. |
| **आयुर्वेदिकऔषधे :** पेस्टोबेन | १०० मिली / लिटर पाण्यात (फवारणी) |


प्रकाशक : **डॉ. एकनाथ भा. चाकूरकर,** निर्देशक, भाकृअनुप.-केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र

संपादक : **श्री एच. आर. सी. प्रभू,** कार्यक्रम समन्वयक

लेखन : **डॉ. संजयकुमार वि. उद्धरवार,** विषय तज्ञ (पशु विज्ञान), **डॉ चेतनकुमार एच. बी.,** शास्त्रज्ञ (पशु विज्ञान)

तकनीकी सह्यायक : **श्री. विश्वजीत प्रजापती,** कार्यक्रम सह्यायक (कॅम्पूटर)

**कृषि विज्ञान केंद्र**

भाकृअनुप-केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र

जुने गोर्वे, गोवा-403402 फोन : 0832-2285475, ई-मेल : pckvknorthgoa@gmail.com वैबसाइट : www.kvkicarrcgoa.in